ePaper

## ‘मोदी सरकार चले जाव’ ; ‘इंडिया’ आघाडीच्या नेत्यांचा मुंबईत एल्गार!



| वर्ष - 7 | अंक - 299 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 18 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- बंगळुरूच्या पोरींची कमाल!
- एल्विशवर पोलिसांची कारवाई
- केजरीवालांना तुरुंगात टाकणार
- माझ्या देशाचं नाव बदलण्याचा प्रयत्न


## मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री चर्चेचे फलित नाहीच

# आढळरावांची चर्चेवर बोळवण?

## » शिरूर लोकसभा : महायुतीच्या जगा वाटपाचा तिढा सुटेना!

**। पिंपरी । महाईन्यूज**

**शिरूर लोकसभेच्या जागेसाठी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना सातत्याने मुंबईवारी करावी लागत आहे. रविवारी (दि. १७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात आली. मात्र अद्याप शिरूरच्या जागेवर तोडगा निघाला नाही. आपले काम सुरूच ठेवा, योग्य वेळी निर्णय घेऊ, असा सल्ला मुख्यमंत्री शिंदे यांनी आढळरावांना दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या जागेची स्पष्टता न करता आढळरावांची केवळ चर्चेवरच बोळवण होत असल्याचे चित्र आहे.**






महायुतीच्या जागेचे कोडे वरिष्ठ पातळीवरूनच अद्याप देखील सुटले नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे प्रचाराला सुरूवात करायची किंवा नाही याचा संभ्रम इच्छुक उमेदवारांमध्ये कायम आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा भाग असलेल्या मावळ आणि शिरूर लोकसभेत देखील हेच चित्र दिसत आहे. महाविकास या मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार निश्चीत झाले आहेत. महायुतीमधील उमेदवार वैयक्तीक पातळीवरच स्वत:ची उमेदवारी माध्यमांसमोर घोषित करत आहेत. कोणत्या पक्षातून लढायचे हे मात्र ठरताना दिसत नाही. शिरूर लोकसभेतून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दंड थोपटले आहे. त्यांच्या उमेदवारीवरून घमासान सुरू आहे. या राजकीय गोंधळामुळे उमेदवारीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच घेतील, असे म्हणत त्यांनी नेत्यांवरच आपली भूमिका सोपावली. त्यामुळे रविवारी (दि. १७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढळरावांशी मुंबइत राजकीय खलबते केले आहेत.

सुमारे दीड तास चर्चेनंतरही शिरूरची जागा कोणासाठी आहे हे स्पष्ट झाले नाही. आपले काम चालूच ठेवा. योग्य वेळी निर्णय घेतला जाइल, असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी आढळरावांना दिल्याची चर्चा आहे. सध्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. तरीही जागेबाबत स्पष्टता न आल्यास शिरूर लोकसभेत महायुतीला फटका बसण्याची शक्यता आहे. उमेदवारीवरून असाच घोळ सुरू राहिल्यास इच्छुकांचा संभ्रम वाढतच राहणार आहे. परिणामी प्रचाराची तयारी करण्यास उशिर होइल. याचा फटका निकालावर पडण्याची खंत आढळरावांसह महायुतीच्या उमेदवारांना पडत आहे. त्यामुळे चर्चेचे गुऱ्हाळ संपून उमेदवारीची स्पष्टता कधी येणार असा प्रश्न आढळरावांसमोर असल्याचे चित्र आहे.

### सक्षम उमेदवार, तरीही फरफट

» शिरूर लोकसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या विरोधात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे सक्षम उमेदवार असल्याचे राजकीय वर्तुळात सांगितले जात आहे. मात्र त्यांच्या उमेदवारीविषयी वरिष्ठांकडून स्पष्ट भूमिका जाहिर न केल्याने त्यांचे राजकीय मुल्य घसरत असल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे ते दोन दिवसात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करतील, अशी चर्चा आहे. मात्र त्यालाही मुहूर्त मिळत नसल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचा सूर दिसत आहे.

## लिफ्टमध्ये अडकलेल्या ७ जणांची सुखरूप सुटका

### » अग्निशमन दलाच्या जवानांची सतर्कता; मोरवाडी येथील घटना

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

लिफ्ट मध्ये अडकलेल्या सात जणांची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली आहे. पिंपरी येथील मोरवाडी भागात असलेल्या रॉयल रेसिडेन्सी या सोसायटीत रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर अचानकपणे बंद पडली होती. त्यानंतर हनुमंत गुब्याड यांनी ९.११ वाजता अग्निशमन दलाला याबाबत माहिती दिली. त्यानंतर काही वेळातच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्यालयातील अग्निशमन केंद्रातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.



### सुटका केलेल्या व्यक्तींची नावे

» १) फयाज (१० वर्ष) कुदळवाडी, २) अंबादास हांडे (६२ वर्ष) जुन्नर, ३)वसंत सातपुते (५७वर्ष) संगमनेर, ४) महादेव सातपुते (६० वर्ष) पुणे, ५) सोन्या सातपुते (५७वर्ष) संगमनेर, ६) जगन्नाथ सातपुते (५४वर्ष) संगमनेर, ७) दिलीप भालके (५७ वर्ष) मोशी. या रेस्क्यू ऑपरेशन मध्ये घटनास्थळी विठ्ठल सफकाळ (लि फा), अमोल चिपळूणकर (D.C.O), चंद्रकांत चव्हाण (T.S.O), विकास कुटे (TF ), महेश इंदलकर (T F), दिपेश दिवेकर (TF ), योगेश ढोले (TF) हे कर्मचारी उपस्थित होते.

# यंदा 'रेडीरेकनर'च्या दरात वाढ?

## » शहरी भागात 9 टक्के, ग्रामीण क्षेत्रात 7 टक्के दरवाढ प्रस्तावित

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळाने वार्षिक चालू बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) नवीन दर आहे तेच ठेवण्याबाबत निर्णय न घेतल्याने यंदा रेडीरेकनरच्या दरात वाढ केली जाणार आहे. ही दरवाढीची १ एप्रिलपासून किंवा लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे.**



राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे. दरवर्षी १ एप्रिलपासून रेडीरेकरनचे नवीन दर जाहीर केले जातात. गेल्या वर्षी कोणतीही दरवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. रेडीरेकनरचे दर निश्चित करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडीरेकनरचे दर निश्चित करण्यात आल्यावर राज्य सरकारकडून त्यावर निर्णय घेण्यात येतो आणि हा निर्णय नोंदणी महानिरीक्षक जाहीर करतात. यंदा लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे राज्य सरकारकडून हस्तक्षेप करण्यात येणार नाही. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी झालेल्या मंत्रिमंडळांच्या बैठकीतही रेडीरेकनरच्या दराबाबत राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदा रेडीरेकनरचे दर 'जैसे थे' ठेवण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.गेल्या वर्षभरात झालेल्या आर्थिक व्यवहारांबाबत माहिती घेऊन नवीन दर निश्चित करण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरात दस्तनोंदणीचे प्रमाण वाढले असून महसुलात भरभक्कम वाढ झाली आहे. १५ मार्चपर्यंत तब्बल ४५ हजार ४५० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. ही बाब विचारात घेऊन रेडीरेकनरचे नवे दर प्रस्तावित करण्यात आले आहेत. शहरी भागात नऊ टक्केतर ग्रामीण भागात सात टक्के अशी वाढ प्रस्तावित केली आहे.लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळाने वार्षिक चालू बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) नवीन दर आहे .राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे.

### महसुलात भरभक्कम वाढ

» राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे.दरवर्षी १ एप्रिलपासून रेडीरेकरनचे नवीन दर जाहीर केले जातात. गेल्या वर्षी कोणतीही दरवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. रेडीरेकनरचे दर निश्चित करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडीरेकनरचे दर निश्चित करण्यात आल्यावर राज्य सरकारकडून त्यावर निर्णय घेण्यात येतो आणि हा निर्णय नोंदणी महानिरीक्षक जाहीर करतात. यंदा लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे राज्य सरकारकडून हस्तक्षेप करण्यात येणार नाही. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी झालेल्या मंत्रिमंडळांच्या बैठकीतही रेडीरेकनरच्या दराबाबत राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदा रेडीरेकनरचे दर 'जैसे थे' ठेवण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.गेल्या वर्षभरात झालेल्या आर्थिक व्यवहारांबाबत माहिती घेऊन नवीन दर निश्चित करण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरात दस्तनोंदणीचे प्रमाण वाढले असून महसुलात भरभक्कम वाढ झाली आहे.

---

# ...तर पुण्यात बॅलेट पेपरवर मतदान करावे लागेल!

## » लोकसभा मतदारसंघात 384 उमेदवार उभे राहू शकतात

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले.आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघांच्या निवडणूक तयारीबाबत जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.**



बारामती, शिरूर आणि मावळ मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुक्रमे कविता द्विवेदी, दिपक सिंगला आणि अजय मोरे, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख या वेळी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत पुण्यातील लोकसभा निवडणुकीबाबत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी रविवारी मोठे विधान केले. डॉ. दिवसे म्हणाले, 'मतदान यंत्रांची क्षमता ही एका लोकसभा मतदारसंघात ३८४ उमेदवार उभे राहू शकतात, त्याला २४ बॅलेट युनिट जोडू शकतो आणि मतदान ईव्हीएमवर घेता येऊ शकेल. मात्र, त्यापेक्षा जास्त उमेदवार उभे राहिल्यास बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे लागेल. अशी परिस्थिती येईलच असे आताच सांगता येणार नाही. बॅलेट पेपरवर निवडणूक झाल्यास मतदानासाठी जास्त मनुष्यबळ लागणार नाही, मात्र मतमोजणीवेळी जास्त टेबल लावावे लागतील. उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर नेमक्या उमेदवारांची संख्या निश्चित झाल्यानंतर गरज भासल्यास केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागविले जाईल. सद्य:स्थितीत जास्त उमेदवार निवडणुकीला उभे राहतील, ही बाब जर-तरची आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व प्रकारची तयारी केली आहे. जास्त उमेदवार निवडणूक रिंगणात असल्यास संबंधित मतदारसंघापुरता वेगळा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मान्यतेने घेतला जाईललोकसभा मतदारसंघ असून बारामतीचे मतदान ७ मे, तर पुणे, शिरूर आणि मावळचे मतदान १३ मे रोजी होणार आहे. त्यामुळे दुबार मतदान होण्याची शक्यता नाही. अंतिम मतदारयादी तयार करताना अनेक दुबार आणि मृत मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.

### निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर


» मतदारांची तपासणी करताना अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत मतदारांची स्वतंत्र यादी केली आहे. त्यामुळे दुबार मतदान होणार नसल्याचा दावाही जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी या वेळी केला.केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले.आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघांच्या निवडणूक तयारीबाबत जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

# आरटीईच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचा मार्ग मोकळा!

## पिंपरी-चिंचवड शहरातील 174 शाळांचा समावेश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरटीई अंतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी राज्य शासनाने १३ कोटी ९४ लाख ७० हजार रुपयांचा निधी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यास मान्यता दिली आहे. जिल्ह्यांनी केलेल्या वाजवी मागणीच्या प्रमाणात निधी वितरीत करावा, असे आदेश शासनाने दिले आहेत. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील १७४ शाळांच्या आरटीईच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच शाळांना ही रक्कम मिळण्याची शक्यता आहे.**




आरटीईच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची रक्कम न मिळाल्याने राज्यभरातील खासगी शाळा नाराजी व्यक्त करत होते. अनेक शाळांनी पुढील वर्षी आरटीईअंतर्गत प्रवेश न देण्याची भूमिका घेतली होती. मात्र राज्य शासनाने शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची रक्कम देण्याला मान्यता दिली आहे. गेल्या वर्षी पिंपरी-चिंचवड शहरात १७४ शाळा पात्र ठरल्या होत्या. या शाळांमध्ये प्रवेश देखील सुरू झाले होते. प्रतीक्षा यादीतील पहिल्या प्रवेशावेळी २ हजार ६६ विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाला होता. या वेळी ११३ अपात्र ठरले तर १ हजार १०२ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला नाही. दुसऱ्या फेरीत ४११ प्रवेश, ३१ अपात्र तर ५४० जणांनी पाठ फिरवली. तिसऱ्या फेरीत १३८ प्रवेश, ११ अपात्र तर २४३ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. चौथ्या फेरीत ७८ विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली. दोन अपात्र ठरले तर केवळ ४७ प्रवेश निश्चित झाले. आरटीईकडून पाचवी अंतिम फेरी असल्याचे जाहीर करण्यात आले. या वेळी सर्व जागांवर प्रवेश प्रक्रिया होण्याची अपेक्षा होती. मात्र या फेरीतही ४१ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला नाही. ६३ जणांची निवड होऊनही केवळ २२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले होते. ज्या विद्यार्थ्यांच्या जागा निश्चित झाल्या आहेत. त्यांची माहिती आरटीईच्या नियमांनुसार अधिकृत संकेतस्थळावर भरावयाची आहे. त्यानुसार शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीचा लाभ शाळांचा मिळणार आहे.

### या गोष्टींची होणार पडताळणी

» इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल या पोर्टलवर अथवा आरटीई पोर्टलवर जाहीर केलेला असावा. ज्या शाळांचे स्वतःचे संकेतस्थळ आहे. अशा शाळांनी शुल्काचा तपशील संकेतस्थळावर देखील जाहीर केलेला असावा. शाळेने शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत आरटीई ची मान्यता प्राप्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन लॉटरी पद्धतीने यापूर्वी ज्या शाळेत प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी संबंधीत शाळेतच शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टल वरून करावी. सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड सरल पोर्टलवर नोंदविलेले असावे. केवळ आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरावी. तसेच प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या संख्येपैकी फक्त २५ टक्के संख्या ही प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. आरटीई अंतर्गत नमूद केल्यानुसार कोणतीही जमीन, इमारत, साधन सामग्री किंवा इतर सुविधा मोफत किंवा सवलतीच्या दरात प्राप्त झाल्याच्या कारणावरून ज्या शाळांना विशिष्ट संख्येतील बालकांना मोफत शिक्षण देण्याची अट घालण्यात आली असेल, अशा शाळा, बालकांच्या विशिष्ट संख्येच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी हक्कदार असणार नाहीत. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनार्थ मंजूर करण्यात आले आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे. वित्त विभागाच्या १२ एप्रिल २०२३ च्या शासन परिपत्रकातील सर्व अटींची पूर्तता होत आहे किंवा नाही या बाबत पडताळणी करण्यात येणार आहे.


# कुणाल आयकॉन रस्ता अत्याधुनिक पद्धतीने विकसित होणार

## नाना काटे यांच्या प्रयत्नांना यश; रस्त्याच्या कामाची काढण्यात आली निविदा

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्र २८ रहाटणी पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रस्ता आत्याधुनिक पद्धतीने विकसित करण्यासाठी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे सातत्याने महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे आज या रस्त्याच्या कामाची निविदा काढण्यात आली असून लवकरच हा रस्ता आत्याधुनिक पद्धतीने स्मार्ट होणार आहे.**




नाना काटे यांनी शिवार चौक ते छत्रपती चौका पर्यंतचा रस्त्याबाबत वारंवार प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या. संपूर्ण पिंपळे सौदागर मधील ९ मीटर ते ४५ मीटर पर्यंतचे रस्ते हे सिमेंट कॉक्रीटचे झाले असून फक्त हाच कुणाल आयकॉन रस्ता बरेच दिवस लालफितीत अडकून पडलेला होता. त्यामुळे लोकप्रतिनिधी या नात्याने परिसरातील नागरिक हा रस्ता कधी होणार किवा याचे डांबरीकारण कधी होणार हा रस्ता सिमेंट कॉक्रीटचा कधी होणार, याचे टेंडर कधी निघणार, या नागरिकांच्या प्रश्नाच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागत होते.

### लवकरच रस्त्याचे काम चालू होणार

» कुणाल आयकॉन रस्ता हा खूप रहदारीचा व वर्दळीचा आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात निवासी सोसायट्या, शाळा, व्यावसायिक दुकाने आहेत त्यामुळे हा रस्ता खूप महत्वाचा आहे ही बाब नाना काटे यांनी याबाबत आयुक्त, अति-आयुक्त, स्थापत्य प्रकल्प, स्मार्ट सिटी विभाग, यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार, प्रत्यक्ष भेटून नागरिकानसमवेत महापालिकेत चर्चा करून त्यांच्या निदर्वेशनास आणून दिली. व त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा देखील केला त्यास अनुसरून यशप्राप्ती म्हणून आज दि १५/०३/२०२४ रोजी महापालिकेच्या स्थापत्य विभागाच्या वतीने निविदा काढण्यात आली आहे व लवकरच या रस्त्याचे काम देखील चालू होणार आहे.

# चांदवडचे शेतकरी महिला अधिवेशन



भूमिका

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' गेल्या गुरुवारी नाशिकजवळील चांदवडमध्ये पोहोचली. त्या निमित्त 'योद्धा शेतकरी' शरद जोशी यांनी एके काळी याच चांदवडमध्ये घेतलेल्या शेतकरी महिला अधिवेशनाचे स्मरण..**

अलीकडच्या काळात नाशिक जिल्हा तिथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यांमुळे राष्ट्रीय पातळीवर जास्त प्रसिद्ध झाला असला तरी सुमारे ४० वर्षांपूर्वी हा जिल्हा शेतकरी आंदोलनाचं मोठं केंद्र होतं. शेतकरी संघटनेचे नेते कै. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पहिल्या ऊस आंदोलनामध्ये या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केवळ सहभाग नोंदवला नाही, तर रक्तही सांडलं. अशा या जिल्ह्यात काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' गेल्या गुरुवारी पोहोचली त्यानिमित्त आयोजित मेळाव्यात शेतकरी आणि कांद्याच्या बाजारपेठेचा प्रश्न केंद्रस्थानी होता. या चांदवड शहराला शेतकरी संघटनेच्या दृष्टीने आणखी ऐतिहासिक महत्त्व आहे. ते म्हणजे, १९८६ साली याच गावात शेतकरी संघटनेतर्फे देशातलं पहिलं शेतकरी महिला अधिवेशन आयोजित करण्यात आलं. त्याला सुमारे २५ हजार महिलांनी हजेरी लावली आणि अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी हा आकडा एक लाखापर्यंत गेला. हे विराट अधिवेशन शेतकरी संघटनेच्या इतिहासातला एक मैलाचा दगड ठरला. त्यातूनच पुढे जोशी यांनी



'लक्ष्मी मुक्ती', 'सीता शेती' यासारखे शेती व्यवहारात स्त्रियांचा हक्क प्रस्थापित करणारे अभिनव उपक्रम सुरू केले आणि त्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. चांदवड येथील नेमिनाथ जैन विद्यालयाच्या प्रांगणावर ९ ते १० नोव्हेंबर १९८६ हे दोन दिवस अधिवेशन झालं. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं चांदवडशी असलेलं नातं लक्षात घेऊन अधिवेशन परिसराला त्यांचं नाव दिलं होतं आणि केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर बिहार, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, गुजरात, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमधूनही काही महिला प्रतिनिधी या अधिवेशनामध्ये सहभागी झाल्या. विदर्भातील बऱ्याच शेतकरी महिला ६-७ नोव्हेंबरलाच घरची चटणी-भाकरी बांधून चांदवडला हजर झाल्या. नोव्हेंबर महिना असल्याने थंडी कडाक्याची होती. अधिवेशनाच्या आदल्या संध्याकाळी मैदानात काही ठिकाणी रात्रीच्या भाजी-भाकरीसाठी चुली पेटल्या होत्या आणि संघटनेकडून गादी-गिरद्यांची काही अपेक्षा न ठेवता, जेवणानंतर अनेकजणी तिथेच निवांतपणे झोपी गेल्या. संघटनेकडून प्रवासखर्च सोडाच, राहण्या-जेवण्याचीसुद्धा फार व्यवस्था नसूनही हजारो महिला आल्या होत्या. आजच्या काळात याची कल्पनासुद्धा करता येणार नाही. दुपारी बरोबर दोन वाजता खुलं अधिवेशन सुरू झालं. व्यासपीठाच्या पडद्यावर एका पाठुंगळी लहान मुलगी आणि हातात खुरपं घेतलेल्या शेतकरी महिलेचं चित्र. आयुष्याची लढाई लढत असलेली झाशीची राणीच जणू! 'किसानांच्या बाया आम्ही, शेतकरी बाया,' हे साने गुरुजींचं गीत आणि 'डोंगरी शेत माझं ग, मी बेणू किती, आलं वरीस राबवलं, मी मरावं किती' ही प्रसिद्ध कवी कै. नारायण सुर्वे यांची कविता महिलांनी समूह स्वरात गायली आणि सगळं वातावरण भारून गेलं. शेतकरी महिला अधिवेशनात हे गाणं म्हटलं गेलं, 'हा कवी म्हणून माझ्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता' असं सुर्वे यांनी नंतर एका प्रकट मुलाखतीत म्हटलं होतं. काही महिला कार्यकर्त्यांच्या भाषणांनंतर शरद जोशी यांचं भाषण झालं. त्यामध्ये त्यांनी ग्रामीण भागात वाढलेली गुंडगिरी आणि महिलांवरच्या अत्याचारांचा उल्लेख करत स्थानिक पातळीवरची सत्ता महिलांच्या हाती दिली तर याला आळा बसेल, असं प्रतिपादन केलं आणि आगामी निवडणुकीत शेतकरी संघटना ग्रामीण भागातील निवडणुकांमध्ये फक्त महिला उमेदवार उभे करेल किंवा अन्य महिला उमेदवारांना पाठिंबा देईल, अशी घोषणा केली. भावी वाटचालीच्या दृष्टीने अधिवेशनातला हा एक महत्त्वाचा निर्णय होता. संघटनेच्या आर्थिक अडचणींबाबतही जोशी आपल्या भाषणात बोलले. त्याला प्रतिसाद म्हणून अधिवेशनाला उपस्थित एका महिलेने स्वत:कडचा सोन्याचा दागिना जोशींना देऊ केला. पण, मी स्त्री-धन घेत नाही, असं सांगून त्यांनी तो नम्रपणे परत केला. शेतकरी महिलांचे कष्ट कमी करण्याची मागणी करणारे ठराव अधिवेशनात मंजूर करण्यात आले. जोशींनी भाषणात घोषणा केलेल्या, निवडणुका लढवण्याच्या निर्णयाचाही त्यामध्ये समावेश होता.

## संपादकीय »

### म्हातारे तितुके..

***अमेरिकेच्या इतिहासातील दोन्ही सर्वाधिक म्हाताऱ्या अध्यक्षीय उमेदवारांची सत्तेची भूक उच्च कोटीची आहे.***

पायऱ्या चढताना–उतरताना काही वेळा धडपडणारा, भाषण करताना शब्दांचे विस्मरण होणारा सहस्राचंद्रदर्शनोत्तर विद्यामान अध्यक्ष एकीकडे... आणि... निवडणुकीला केवळ सत्तासोपानापर्यंत पोहोचण्याची शिडी मानणारा आणि कायद्याच्या नि कर्जफेडीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी(च) व्हाइट हाऊसचा आसरा शोधणारा, पत्नीच्या नावाचा उच्चार 'मर्सिडीज' असा करणारा अमृत महोत्सवोत्तर प्रतिस्पर्धी दुसरीकडे... जगातील सर्वशक्तिमान लोकशाही देशाला त्यांचा सर्वशक्तिमान अध्यक्ष निवडण्यासाठी अशा दोघांपलीकडे उमेदवार सापडू नये, ही म्हटले तर शोकान्तिका, म्हटला तर विनोद. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी दुसऱ्यांदा जो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्प या दोहोंमध्ये लढत होईल, हे काही दिवसांपूर्वीच स्पष्ट झाले होते. परवाच्या काही पक्षांतर्गत निवडणुकांपश्चात त्यावर शिक्कामोर्तब झाले.

राजकारणात महिलांचे प्रमाण गेल्या दशकभरात लक्षणीयरीत्या वाढले आहे. लोकसभा आणि विधानसभांच्या पातळीवर महिलांना ३३ टक्के प्रतिनिधित्व देण्याचा प्रस्ताव वारंवार मागे पडतो हे खरेच, पण २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांनी मात्र पुरुषांहून अधिक प्रमाणात मतदान केले.

# राजकारणाचा खेळ होणे चूकच..!

त्या निवडणुकीतील महिला मतदारांची टक्केवारी, पुरुष मतदारांपेक्षा ०.१७ टक्क्यांनी का होईना, जास्त आहे. महिला मतदारांमधली वाढ हेदेखील एक सुचिन्हच आहे. राजकीय पक्षांनाही या वाढत्या प्रमाणामुळेच जाणीव होऊ लागली आहे की, महिला हा मतदारांपैकी एक विशिष्ट समूह आहे... महिलांच्या गरजा, मागण्या निराळ्या असू शकतात आणि त्यांकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते. या राजकीय हिशेबामुळेही असेल, पण सध्या राजकीय पक्षांच्या प्रचारमोहिमा आणि जाहीरनामे यांमध्ये महिलांच्या मुद्द्यांना स्थान मिळू लागल्याचे दिसते आहे. रोजगार, आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता, आकांक्षा आणि आर्थिक सक्षमता हे महिलांच्या दृष्टीने कळीचे मानले जाणारे मुद्दे बहुतेक राज्य सरकारांच्या अजेंड्यावर आता आलेले आहेत. आजघडीला पश्चिम बंगाल हे महिला मुख्यमंत्री असलेले एकमेव राज्य. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना गेल्या विधानसभा



निवडणुकीत महिलांची ५० टक्के मते मिळाली, तर याच राज्यात '२०० पार' जागा मिळवण्याच्या वल्गना करणाऱ्या भाजपला ३७ टक्के महिलांची मते मिळवता आली होती.

भाजपच्या 'बेटी पढाओ, बेटी बचाओ' सारख्या घोषणा तेव्हाही दिल्या जात होत्या, पण त्यांचा प्रभाव दिसला नाही असा याचा अर्थ. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही मोदींच्या पक्षाला महिलांची ३५ टक्के मतेच मिळवता आली. यंदाच्या लोकसभा प्रचारात भाजपची '४०० पार' ही घोषणा उच्चरवाने दिली जाते आहे. पण पश्चिम बंगालमध्ये महिलांची मते मिळवणे कठीण असल्याची पुरेपूर जाणीव भाजपला एव्हाना झालेली असावी. महिलांचा विश्वास तृणमूल काँग्रेसच्या सरकारवर आणि ममता बॅनर्जींच्या नेतृत्वावर अढळ असण्याला काही ठोस कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे 'स्त्री-केंद्री शासना'ची नुसती घोषणा न करता, महिला आणि मुले यांच्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद या राज्यातील सरकारने केलेली आहे. यंदाच्या (२०२४-२५) राज्य अर्थसंकल्पाला जोडून निराळे 'लिंगभाव व बाल अर्थसंकल्पीय निवेदन' पश्चिम बंगालच्या विधानसभेत मांडण्यात आले आणि राज्याच्या एकंदर अर्थसंकल्पीय खर्चापैकी ४४ टक्के रक्कम ही यंदा महिला सक्षमीकरणाच्या कामी येणार आहे. महिलांसाठी अनेक अभिनव योजना पश्चिम बंगालनेच सर्वांआधी आणल्या आणि यशस्वीपणे, पारदर्शीपणे राबवल्या. उदाहरणार्थ 'कन्याश्री प्रकल्प' मधून लहान मुलींना आर्थिक मदत मिळते, 'लक्ष्मीर भाण्डार'मधून राज्यातील तब्बल १.९८ कोटी 'कुटुंबप्रमुख महिलां'ना दरमहा ठरावीक रकमेचे थेट हस्तांतर केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माझ्या देशाचं नाव बदलण्याचा प्रयत्न!

## उद्धव ठाकरेंचा भाजपा सरकारवर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मणिपूरहून निघालेल्या राहुल गांधी यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’चा आज (१७ मार्च) मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कवरील जाहीर सभेने समारोप झाला. या निमित्ताने विरोधकांच्या इडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले. मणिपूरमधून निघालेली राहुल गांधी यांची यात्रा दोन महिन्यानंतर सुमारे ६,७०० किलोमीटरचा प्रवास करून दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी या स्मारकस्थळी शनिवारी दाखल झाली.**

त्यानंतर आज राहुल गांधी यांनी शिवाजी पार्कवर त्यांच्या यात्रेचा समारोप केला. शिवाजी पार्कवर इंडिया आघाडीचे अनेक मोठे नेते उपस्थित होते. जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन यांच्यापासून ते शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ नेते शरद पवारांपर्यंत अनेक मोठे नेते यावेळी इंडिया आघाडीच्या मंचावर उपस्थित होते.यावेळी, उद्धव ठाकरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकास्र डागलं. उद्धव ठाकरे म्हणाले, मी नेहमी सांगतो माझा देश हाच माझा धर्म आहे आणि आपला हा देश वाचला तर आपण वाचू. आपला देश हीच आपली किंवा एखाद्या व्यक्तीची ओळख असली पाहिजे. एका व्यक्तीवरून देशाची ओळख होता कामा नये. कोणी कितीही मोठा असला तरी माझा देश त्याच्यापेक्षा मोठा आहे. आपण म्हणतो हा माझा देश आहे, या देशाच्या सरकारला भारत सरकार म्हणतो. परंतु, ते लोक ‘मोदी सरकार, मोदी सरकार अशी जाहिरात करताय. तुमच्या डोक्यात माझ्या देशाचं नाव बदलण्याचं स्वप्न आहे का? भारत हे माझ्या देशाचं नाव आहे आणि आम्ही ते कोणालाही बदलू देणार नाही.उद्धव ठाकरे म्हणाले, आजपर्यंत आपण अनेक अनुभव घेतले. आम्हाला असं वाटत




होतं की, देशासाठी मजबूत सरकार पाहिजे. आम्हाला आता अनुभवानंतर खूप काही कळलंय. पूर्वी आपलं युतीचं सरकार होतं. अटल बिहारी वाजपेयी देशाचे पंतप्रधान होते. त्या सरकारमध्ये अनेक पक्ष होते. आम्ही होतो, ममता बॅनर्जी होत्या, जयललिता होत्या. अटलजींनी उत्तम प्रकारे सरकार चालवलं होतं. त्यानंतर नरसिंह राव यांचं सरकार आलं, त्यानंतर मनमोहन सिंग यांचं सरकार आलं. देश उत्तम प्रकारे प्रगती करत होता. परंतु, २०१४ पासून एका पक्षाचं सरकार आहे. त्यानंतर २०१९ मध्येही तेच आले. आता ते २०२४ च्या गोष्टी करतायत. तसेच ते लोक म्हणतायत की ‘विरोधक अद्याप २०२९ मध्ये अडकलेत, मात्र आम्ही २०४७ ची तयार केली आहे.’ मला त्यांना सांगायचं आहे की, कुठलाही राज्यकर्ता सत्तेचा अमरपट्टा घेऊन येत नाही. देशाच्या जनतेसमोर हुकूमशाह कितीही मोठा असला तरी सगळी जनता एकवटते तेव्हा हुकूमशाहाचाही अंत होतो. आपल्या देशात आता ती वेळ आली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. आपला इतिहास आहे की, फोडा आणि राज्य करा अशी ज्याची नीती असेल त्याच्या छाताडावर आपण राज्य करायचंय. ते लोक म्हणतील, ‘अब की बार ४०० पार, आपण मात्र ‘अब की बार भाजपा तडीपार’वर कायम राहायचं आहे. त्यासाठीच आज आपण या शिवतीर्थावरून रणशिंग फुंकलंय.उद्धव ठाकरे सभेला संबोधित करताना म्हणाले की, महात्मा गांधीजींनी 1942 साली इंग्रजांना चले जावं सांगितलं होतं आज जी काय हुकूमशाही दिल्लीमध्ये आपल्याला लोकशाही मारण्यासाठी टपलेली आहे तिला तडीपार करण्यासाठी आपण (राहुल गांधी) शिवाजी पार्क निवडलं त्याच्याबद्दल मी तुम्हाला खास धन्यवाद देतो. खरं पाहिलं तर हा एक फुगा आहे आणि मला वाईट एका गोष्टीचं वाटतं की या फुग्यामध्ये हवा भरण्याचं काम आम्हीच केलं होतं. संपूर्ण देशात त्यांचे दोन खासदार होते. त्या फुग्यामध्ये आम्ही हवा भरली आणि त्यांच्या डोक्यामध्ये हवा गेले. त्यांची स्वप्न आम्हाला सुद्धा विचारतात तेव्हा तुमच्या किती सीट येतील तेव्हा विचारलं तेव्हा चारशे पार म्हणता ते काय फर्निचर दुकान आहे का?ते पुढे म्हणाले की, आज देशभरातून सगळ्या राज्यातून महत्त्वाचे नेते नेते इथे आलेत आणि आपल्याला असं वाटत असेल की ही परिस्थिती केवळ महाराष्ट्रमध्ये तसं नाही.

### अब की बार भाजप तडीपार

» आज राहुल गांधी यांनी शिवाजी पार्कवर त्यांच्या यात्रेचा समारोप केला. शिवाजी पार्कवर इंडिया आघाडीचे अनेक मोठे नेते उपस्थित होते. जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन यांच्यापासून ते शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ नेते शरद पवारांपर्यंत अनेक मोठे नेते यावेळी इंडिया आघाडीच्या मंचावर उपस्थित होते.यावेळी, उद्धव ठाकरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकास्र डागलं. उद्धव ठाकरे म्हणाले, मी नेहमी सांगतो माझा देश हाच माझा धर्म आहे आणि आपला हा देश वाचला तर आपण वाचू. आपला देश हीच आपली किंवा एखाद्या व्यक्तीची ओळख असली पाहिजे. एका व्यक्तीवरून देशाची ओळख होता कामा नये. कोणी कितीही मोठा असला तरी माझा देश त्याच्यापेक्षा मोठा आहे. आपण म्हणतो हा माझा देश आहे, या देशाच्या सरकारला भारत सरकार म्हणतो. परंतु, ते लोक ‘मोदी सरकार, मोदी सरकार अशी जाहिरात करताय. तुमच्या डोक्यात माझ्या देशाचं नाव बदलण्याचं स्वप्न आहे का? भारत हे माझ्या देशाचं नाव आहे आणि आम्ही ते कोणालाही बदलू देणार नाही.उद्धव ठाकरे म्हणाले, आजपर्यंत आपण अनेक अनुभव घेतले.

# काँग्रेस सोडताना एक नेता माझ्या आईकडे रडत आला

## राहुल गांधींनी सांगितला ‘तो’ प्रसंग; रोख नक्की कोणावर?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही महिन्यांत काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन अनेक वरिष्ठ नेत्यांनी भाजपा किंवा भाजपासमर्थक पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. महाराष्ट्रातही अनेक नेते काँग्रेसला रामराम ठोकून महायुतीत सामील झाले आहेत.**

यावरून राहुल गांधी यांनी आज एका नेत्याबाबत माहिती दिली. महाराष्ट्रातील एक वरिष्ठ नेता सोनिया गांधी यांच्याकडे रडला होता, असं राहुल गांधी म्हणाले. भारत जोडो न्याय यात्रेचा सांगता सोहळा आज दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कात आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवरून जनतेशी संवाद साधला.राहुल गांधी म्हणाले, “एका वरिष्ठ नेत्याने काँग्रेस सोडली. मी नाव घेऊ इच्छित नाही. पण ते रडत माझ्याकडे आईकडे आले. आईकडे येऊन म्हणाले, सोनियाजी मला लाज वाटतेय. या लोकांविरोधात, या शक्तीविरोधात लढण्याची हिंमत माझ्याकडे नाही. मी तुरुंगात जाऊ इच्छित नाही.”राहुल गांधी




पुढे म्हणाले, “हे एकमेव नेते नाहीत. असे हजारो लोक आहेत. ज्यांना घाबरवलं गेलं आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे नेतेही असेच गेले. मी ज्या शक्तीबद्दल बोलत आहे, त्या शक्तीने या लोकांचा गळा पकडून त्यांना भाजपात पाठवलं आहे. त्यामुळे हे सर्व घाबरून गेले आहेत.” हा प्रसंग सांगता राहुल गांधी यांनी कोणाचंही नाव घेतलं नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील नेमक्या कोणत्या नेत्याबाबत त्यांनी भाष्य केलं हे गुलदस्त्यात आहे.“आम्ही सर्व मोदींविरोधात लढत आहोत, असं म्हटलं जातंय. पण आम्ही एकाही व्यक्तीच्या विरोधात लढत नाहीत. आम्ही भाजपा किंवा कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात नाहीत. परंतु, एका व्यक्तीचा चेहरा तयार करून ठेवला आहे. हिंदू धर्मात शक्ती शब्द आहे. आम्ही या शक्तीविरोधात लढत आहोत, असं राहुल गांधी म्हणाले.“आता प्रश्न निर्माण होतो की ती शक्ती कोणती आहे? राजाचा आत्मा ईव्हीएममध्ये आहे, हे खरं आहे. राजाचा आत्मा ईव्हीएममध्ये आहे, हिंदुस्तानच्या प्रत्येक संस्थेत आहे, ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स विभागात आहे. तसंच, मोदी फक्त एक मुखवटा आहे. त्यांना बॉलिवूडच्या अभिनेत्यांप्रमाणे रोल दिले गेले आहेत,.

### मी नाव घेऊ इच्छित नाही

» मी नाव घेऊ इच्छित नाही. पण ते रडत माझ्याकडे आईकडे आले. आईकडे येऊन म्हणाले, सोनियाजी मला लाज वाटतेय. या लोकांविरोधात, या शक्तीविरोधात लढण्याची हिंमत माझ्याकडे नाही. मी तुरुंगात जाऊ इच्छित नाही.”राहुल गांधी पुढे म्हणाले, “हे एकमेव नेते नाहीत. असे हजारो लोक आहेत. ज्यांना घाबरवलं गेलं आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे नेतेही असेच गेले.

# मोदी केजरीवालांना तुरुंगात टाकणार!

## आज पुन्हा त्यांना दोन वेगवेगळ्या प्रकरणात नोटीस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली न्यायालयाने शनिवारी (दि. १६ मार्च) दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी जामीन मंजूर केला होता. मात्र दुसऱ्याच दिवशी ईडीने त्यांना दोन प्रकरणात पुन्हा एकदा नोटीस बजावली आहे. दिल्ली सरकारच्या रद्द केलेल्या अबकारी धोरणासंबंधी एक आणि दिल्ली जल मंडळ मनी लाँडरिंग प्रकरणी एक, अशा दोन नोटीस त्यांना देण्यात आल्या आहेत. दिल्ली जल मंडळाच्या प्रकरणात १८ मार्च आणि अबकारी धोरणाच्या प्रकरणासाठी २१ मार्च रोजी तपास यंत्रणेसमोर चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे आदेश केजरीवाल यांना देण्यात आले आहेत.**



ईडीकडून केजरीवाल यांना नोटीस बजावण्याची ही नववी वेळ आहे. याआधी आठ नोटीस देण्यात आल्या होत्या. मात्र केजरीवाल यांनी चौकशीला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला होता. आता नव्या नोटीसीनंतर 'आप'च्या मंत्री अतिशी म्हणाल्या की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे काल स्वतः न्यायालयात उपस्थित होते. कथित मद्य घोटाळ्याच्या चौकशीसाठी ते उपस्थित न राहण्याबाबत न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता. आता हे प्रकरण न्यायालयात आहे. ईडीचे आरोप खरे आहेत की खोटे, याचा निर्णय व्हायचा बाकी आहे. मात्र तरीही ईडीचे समाधान झाले नसून त्यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांना नोटीस बजावली आहे."ईडीच्या नोटीशीवरुन हे स्पष्ट होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांना थांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मोदी आणि त्यांचा भाजपा पक्ष आता न्यायालय, लोकशाही किंवा न्यायाचीही फिकीर करत नाही. त्यांना फक्त निवडणुकीची काळजी वाटते म्हणून ते विरोधकांना तुरुंगात डांबण्याचे काम करत आहेत", असा आरोप अतिशी यांनी लावला. दरम्यान दिल्ली न्यायालयात मुख्यमंत्री केजरीवाल यांनी सांगितले की, त्यांनी जाणीवपूर्वक ईडीचे समन्स टाळलेले नाहीत. मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीत व्यस्त असल्यामुळे त्यांना चौकशीसाठी हजर राहणे जमले नाही. ३ फेब्रुवारी रोजी केजरीवाल यांनी पाचव्या नोटीशीनंतरही चौकशीला उपस्थित न राहिल्यामुळे ईडीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९० आणि कलम २०० नुसार न्यायालयात तक्रार दाखल केली होती. पीएमएलए कायद्याअंतर्गत मनी लाँडरिंग सारख्या गंभीर गुन्ह्यात मुख्यमंत्री सहकार्य करत नसल्याचा आरोप ईडीने केला होता.कथित मद्य घोटाळ्याच्या चौकशीसाठी ते उपस्थित न राहण्याबाबत न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता. आता हे प्रकरण न्यायालयात आहे. ईडीचे आरोप खरे आहेत की खोटे, याचा निर्णय व्हायचा बाकी आहे. मात्र तरीही ईडीचे समाधान झाले नसून त्यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांना नोटीस बजावली आहे."ईडीच्या नोटीशीवरुन हे स्पष्ट होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांना थांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मोदी आणि त्यांचा भाजपा पक्ष आता न्यायालय, लोकशाही किंवा न्यायाचीही फिकीर करत नाही. त्यांना फक्त निवडणुकीची काळजी वाटते म्हणून ते विरोधकांना तुरुंगात डांबण्याचे काम करत आहेत", असा आरोप अतिशी यांनी लावला. दरम्यान दिल्ली न्यायालयात मुख्यमंत्री केजरीवाल यांनी सांगितले की, त्यांनी जाणीवपूर्वक ईडीचे समन्स टाळलेले नाहीत. मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीत व्यस्त असल्यामुळे त्यांना चौकशीसाठी हजर राहणे जमले नाही.

### ईडीचे आरोप खोटे आहेत

» दिल्ली न्यायालयाने शनिवारी (दि. १६ मार्च) दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी जामीन मंजूर केला होता. मात्र दुसऱ्याच दिवशी ईडीने त्यांना दोन प्रकरणात पुन्हा एकदा नोटीस बजावली आहे. दिल्ली सरकारच्या रद्द केलेल्या अबकारी धोरणासंबंधी एक आणि दिल्ली जल मंडळ मनी लाँडरिंग प्रकरणी एक, अशा दोन नोटीस त्यांना देण्यात आल्या आहेत. दिल्ली जल मंडळाच्या प्रकरणात १८ मार्च आणि अबकारी धोरणाच्या प्रकरणासाठी २१ मार्च रोजी तपास यंत्रणेसमोर चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे आदेश केजरीवाल यांना देण्यात आले आहेत. ईडीकडून केजरीवाल यांना नोटीस बजावण्याची ही नववी वेळ आहे. याआधी आठ नोटीस देण्यात आल्या होत्या. मात्र केजरीवाल यांनी चौकशीला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला होता. आता नव्या नोटीसीनंतर 'आप'च्या मंत्री अतिशी म्हणाल्या की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे काल स्वतः न्यायालयात उपस्थित होते. कथित मद्य घोटाळ्याच्या चौकशीसाठी ते उपस्थित न राहण्याबाबत न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता. आता हे प्रकरण न्यायालयात आहे. ईडीचे आरोप खरे आहेत की खोटे, याचा निर्णय व्हायचा बाकी आहे.

# निवडणुका जाहीर होताच मोदींना परदेशातूनही पाठिंबा

## पाठिंबा दर्शविण्यासाठीलंडनमध्ये कार रॅलीचं आयोजन करण्यात आलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहे. १९ एप्रिलपासून देशभर लोकशाहीचा सर्वांत मोठा सण साजरा केला जाणार आहे. सात टप्प्यांत हे मतदान पार पडणार असून त्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने नियोजनही केलं आहे. दरम्यान, लोकसभेच्या निवडणुका लागताच सर्वच पक्षांनी आता कंबर कसली आहे. तर, भारताबाहेरही निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दर्शवण्यासाठी लंडनमध्ये एका कार रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजपाच्या युकेतील ओव्हरसीज फ्रेंड्स ने या कार रॅलीचं आयोजन केलं होतं. या कार रॅलीतून भाजपाला अतूट पाठिंबा दर्शवण्यात आला आहे.या रॅलीची सुरुवात नॉर्थोल्ट येथील कच्छ लेवा पाटीदार समाज संकुलापासून झाली आणि नियाडेन येथील BAPS स्वामीनारायण मंदिर येथे समारोप झाला. 'ओव्हरसीज फ्रेंड्स ऑफ बीजेपी' ने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, एकता आणि उत्साह दर्शवण्यासाठी सांस्कृतिक प्रदर्शनांसह रॅलीची सुरुवात झाली. देशातील सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी भाजप आणि पंतप्रधान मोदींना



मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शवणाऱ्या या रॅलीमध्ये २५० हून अधिक कार सहभागी झाल्या होत्या. रॅलीत सहभाग घेतलेल्या ब्रिटनमधील सदस्यांनी भारतीय तिरंगा तसेच भाजपचे झेंडे हातात घेतले होते.तसेच रॅलीमध्ये भाग घेऊन, यूकेचे संसदपटू आणि पद्मश्री बॉब ब्लॅकमन यांनी कार रॅली लंडनमधील स्वामीनारायण मंदिरात संपल्यानंतर भारतीय समुदायाच्या सदस्यांना संबोधित केले. त्यांनी या कार्यक्रमाचे महत्त्व आणि त्यांच्या मातृभूमीचे भविष्य घडवण्यात भारतीय समुदायाची महत्त्वपूर्ण भूमिका यावर भर दिला.निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या तारखा अधिसूचित केल्याच्या दिवशी पंतप्रधान मोदी आणि भाजपच्या समर्थनार्थ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.ब्लॅकमन म्हणाले, "भारतीय निवडणूक ही एक प्रचंड निवडणूक आहे. या निवडणुकीत भाजपा ४०० पेक्षा जास्त बहुमतासह विजयी ठरेल. आता भारत आणि युनायटेड किंगडममधील मैत्री अधिक घट्ट होत आहे जेव्हापासून आम्ही सरकारमध्ये सहभागी झालो आहोत आणि भाजपने भारतात सत्ता मिळवली आहे.

### 250 हून अधिक कार सहभागी

» भाजपाच्या युकेतील ओव्हरसीज फ्रेंड्स ने या कार रॅलीचं आयोजन केलं होतं. या कार रॅलीतून भाजपाला अतूट पाठिंबा दर्शवण्यात आला आहे.या रॅलीची सुरुवात नॉर्थोल्ट येथील कच्छ लेवा पाटीदार समाज संकुलापासून झाली आणि नियाडेन येथील BAPS स्वामीनारायण मंदिर येथे समारोप झाला. 'ओव्हरसीज फ्रेंड्स ऑफ बीजेपी' ने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, एकता आणि उत्साह दर्शवण्यासाठी सांस्कृतिक प्रदर्शनांसह रॅलीची सुरुवात झाली. देशातील सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी भाजप आणि पंतप्रधान मोदींना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शवणाऱ्या या रॅलीमध्ये २५० हून अधिक कार सहभागी झाल्या होत्या.

# एल्विश यादववर पोलिसांची मोठी कारवाई



बिग बॉस सिजन 2 (चा विनर आणि युट्युबर एल्विश यादवला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीये. सापाच्या विषाची तस्करी केल्याप्रकरणी एल्विशवर गुन्हा दाखल करण्यात आली आहे. दरम्यान त्याच संदर्भात रविवार 17 मार्च रोजी एल्विशला चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. त्यानंतर एल्विशला पुरव्यासह अटक करुन न्यायालयात हजर केले. दरम्यान कोर्टाने आता एल्विशला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. डीसीपी सेंट्रल नोएडा, विद्या सागर मिश्रा यांनी या प्रकरणात माहिती देताना म्हटलं की, हे वन्यजीव संरक्षणाचे प्रकरण आहे. 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी मागितली होती. यापूर्वी वन्यजीव संरक्षण अंतर्गत तक्रार करण्यात आली होती. तपासानंतर एल्विश यादवविरुद्ध एनडीपीएस कायद्याअंतर्गतही कारवाई करण्यात आलीये. या तपासात पुढे आणखी काही जणांची नावे समोर आल्याच त्यांच्यावरही कारवी केली जाणार आहे. पीपल फॉर ॲनिमल्सने एक स्टिंग ऑपरेशन केले होते. यादरम्यान, बिग बॉस ओटीटी 2 विजेता एल्विश यादव रेव्ह पार्ट्यांमध्ये सापाच्या विषाची तस्करी करत असल्याचं समोर आलं आहे.एल्विशला नोएडाच्या सेक्टर 113 मधून अटक करण्यात आली आहे. एल्विशपार्टी आणि क्लबमध्ये सापाचे विष पुरवल्याचा आरोप आहे, जो देशात गुन्हा आहे. नोएडा पोलिसांनी एल्विशवर एनडीपीएस कायदाही लागू केल्याचे सांगण्यात येत आहे.नोएडा पोलिसांनी एल्विश यादवविरुद्ध आयपीसी, वन्यजीव संरक्षण कायदा आणि एनडीपीएस कायद्यांर्गत गुन्हा दाखल केला आहे. एल्विश दोषी आढळल्यास 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.

# नीना कुळकर्णी पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर

स्टार प्रवाहकडून पुन्हा एकदा पुढचं पाऊल टाकत तिसऱ्या नव्या मालिकेची घोषणा करण्यात आली आहे. 'येड लागलं प्रेमाचं' ही नवी मालिका स्टार प्रवाहवर लवकरच सुरु होणार आहे. या मालिकेतून ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुळकर्णी या छोट्या पडद्यावरुन पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्याचप्रमाणे पूजा बिरारी आणि विशाल निकम ही नवी कोरी जोडी या मालिकेत झळकणार आहेत. अभिनेत्री अतिशा नाईक या मालिकेत खलनायिकेच्या भूमिकेत दिसतील. स्टार प्रवाह वाहिनीवर उद्यापासून म्हणजेच 17 मार्च पासून घरोघरी मातीच्या चुली आणि साधी माणसं या दोन नव्या मालिका सुरु होणार आहेत. त्यातच आता स्टार प्रवाहकडून तिसरी मालिका तयार करण्यात आली आहे. सध्या अनेक वाहिन्यांवर नव्या मालिका सुरु होणार आहेत. झी मराठी




वाहिनीवर येत्या काळामध्ये पाच नव्या मालिका सुरु होतील. या शर्यतीमध्ये स्टार प्रवाह वाहिनीने त्यांच्या दोन नव्या मालिकांची घोषणा केली होती. येड लागलं प्रेमाचं या मालिकेचा पहिला प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या प्रोमोमध्ये अभिनेत्री नीना कुळकर्णी, अतिशा नाईक, पूजा बिरारी, विशाल निकम हे कलाकार पाहायला मिळणार आहेत. अभिनेत्री पूजा बिरारी ही स्टार प्रवाहच्या स्वाभिमान - शोध अस्तित्वाचा या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. विशाल निकम हा स्टार प्रवाहवरील साता जन्माच्या गाठी या मालिकेत झळकला होता. वाहिनीकडून आता त्यांच्या नव्या मालिकेचा प्रोमो शेअर करण्यात आला असून याला ऐक ना जनाचं, ते ऐक ना मनाचं... असं कॅप्शन देण्यात आलं आहे. येड लागलं प्रेमाचं या मालिकेचा पहिला प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या प्रोमोमध्ये अभिनेत्री नीना कुळकर्णी, अतिशा नाईक, पूजा बिरारी, विशाल निकम हे कलाकार पाहायला मिळणार आहेत.

# नताशा होतेय ट्रोल

बॉलीवूडचा सुपरस्टार वरुण धवन सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. वरुण धवनची पत्नी नताशा दलाल गरोदर असल्याची बातमी एका महिन्यापूर्वी सांगून वरुणने चाहत्यांना सुखद धक्का दिला. नुकत्याच पार पडलेल्या अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या प्री-वेडिंग सोहळ्यालाही या कपलने हजेरी लावली होती. अशातच आता नताशा दलाल मोठ्या प्रमाणात ट्रोल होत आहे. नताशा दलालचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओत नताशा तिच्या वहिनीबरोबर म्हणजेच वरुणच्या मोठ्या भावाच्या पत्नीबरोबर दिसतेय. यात नताशाने गुलाबी रंगाचा ड्रेस आणि सफेद रंगाचा ब्लेझर घातला आहे. मॅचिंग पर्स, खुले केसं, आणि बेबी बम्प फ्लॉट करताना नताशा दिसतेय. पण, चाहत्यांचं लक्ष तिच्या सॅंडल्सने वेधून घेतलं आहे.नताशाने हिल्स घातल्याने नेटकरी संतप्त झाले आहेत. अनेकांनी कमेंट्समध्ये आपल्या प्रतिक्रिया मांडल्या आहेत. "गरोदर असून तिने हिल्स घातल्या आहेत", "पोटात बाळ आहे आणि नताशाने हिल्स घातल्या आहेत", अशा अनेक नकारात्मक कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत. दरम्यान, नताशा दलाल वरुण धवनबद्दल सांगायचं झाल्यास, अनेक वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर २४ जानेवारी २०२१ रोजी दोघांचा लग्नसोहळा थाटामाटात पार पडला. लग्नाच्या तीन वर्षांनंतर आता नताशा दलाल लवकरच गुड न्यूज देणार आहे. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत वरुणने ही आनंदाची बातमी दिली. या फोटोला कॅप्शन देत वरुणने लिहिले, "आम्ही गरोदर आहोत, आता आम्हाला तुमच्या आशीर्वादाची आणि प्रेमाची गरज आहे."



# 8 तास उभं राहिल्याचं समाधान

मुंबईत नुकतच हॉलीवूडचा प्रसिद्ध गायचा कॉन्सर्ट पार पडला. मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे हा कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता. या कॉन्सर्टला हजारोंच्या संख्येत प्रेक्षकांनी हजेरी लावली होती. त्यातच काही मराठी कलाकार देखील या कॉन्सर्टला उपस्थित होते. अभिनेत्री मिताली मयेकर हीने या कॉन्सर्टमधला कलाकरांचा फोटो शेअर केलाय. मितालीसोबत या कॉन्सर्टला अभिनेता सिद्धार्थ चांदेकर गायक रोहित राऊत मितालीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरुन या कॉन्सर्टमधला एका व्हिडिओ देखील शेअर केलाय. त्याला तिने दिलेल्या कॅप्शने साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलंय. मुंबईत मागील काही दिवसांपासून च्या कॉन्सर्टची साऱ्यांनाच उत्सुकता होती.

# तब्बू, करीनाच्या 'क्रू' चित्रपटावर सेन्सॉर बोर्डाची कात्री

बॉलीवूड अभिनेत्री तब्बू, करीना कपूर खान, क्रिती सेनॉन यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'क्रू' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमाच्या ट्रेलरला सध्या प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामधील मुख्य पात्रांची केमिस्ट्री, पटकथा आणि विनोद या सर्वांचं भरभरून कौतुक करण्यात आलं परंतु, चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाने निर्मात्यांना अनेक बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. 'क्रू' चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये हवाई सुंदरीची भूमिका साकारणारी तब्बू एका प्रवाशाला आक्षेपार्ह शब्द वापून खाली बस असं सांगते. या जागी मूळ चित्रपटात 'भुतिये' हा शब्द वापरण्यात येणार आहे. याशिवाय सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (CBFC) ने मोठ्या स्क्रीनवर दाखवण्यात येणाऱ्या ट्रेलरमध्ये बरेच बदल केले आहेत.चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये एका दृश्यामध्ये 'हXXXदे' च्या जागी 'अमीरजादे' असा बदल करण्यात आला आहे. याशिवाय 'हXXयों'च्या जागी चित्रपटात 'कमीनो' असा बदल करण्यात आला आहे.तब्बू, करीना कपूर खान आणि क्रिती सेनॉन यांच्याशिवाय 'क्रू'मध्ये दिलजीत दोसांझही दिसणार आहे. तर, कपिल शर्मा यात कॅमिओ करताना दिसणार आहे. हा चित्रपट राजेश कृष्णन यांनी दिग्दर्शित केला असून एकता आर कपूर, शोभा कपूर, अनिल कपूर आणि रिया कपूर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

# बंगळुरुच्या पोरींची कमाल!

## वुमन्स प्रिमियर लीगमध्ये पटकावले जेतेपद

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**एलिस पेरीच्या जबरदस्त चौकार आणि अखेरीस रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जेतेपदावर आपले नाव कोरले आहे. महिला प्रीमियर लीग २०२४ मध्ये अष्टपैलू खेळी करत आरसीबीच्या संघाने दिल्ली कॅपिटल्स संघाचा ८ विकेट्सने पराभव केला. आयपीएल आणि डब्ल्यूपीएलमधील एकूण १७ वर्षांचा ट्रॉफीचा दुष्काळ संपवला आहे. मॉलिन्यू, श्रेयंका आणि आशा शोभनाच्या भेजक गोलंदाजीच्या जोरावर आरसीबी संघाने पहिल्याच डावात सामना आपल्या बाजूने वळवून घेतला. या पराभवासह दिल्ली कॅपिटल्सला सलग दुसऱ्यांदा अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे.**



दिल्ली कॅपिटल्सची फलंदाजी बाजू या सामन्यात पूर्णपणे फ्लॉप ठरली. त्यांनी आरसीबी संघाला विजयासाठी ११४ धावांचे लक्ष्य दिले होते. मेग लॅनिंग आणि शफालीने संघाला एक शानदार सुरूवात करून दिली. पॉवरप्लेपर्यंत या दोन्ही सलामीवीरांनी ६१ धावांचा डोंगर उभारला. त्यांची विस्फोटक फलंदाजी पाहता धावसंख्या मोठा टप्पा गाठेल असे वाटले होते. पण संघाला पूर्ण २० षटकेही फलंदाजी करता आली नाही. सोफी मॉलिन्यूचे दिल्लीच्या डावातील आठवे षटक सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. पुन्हा एकदा एलिस पेरी आणि रिचा घोष या दोन अफलातून फलंदाजांनी सामन्याच्या अखेरपर्यंत मैदानात कायम राहत संघाला विजय मिळवून दिला. ११४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना डिव्हाईन आणि मानधनाने संघाला चांगली सुरूवात करून दिली. लक्ष्य साधारण असल्याने दोघीही शांत फलंदाजी करत होत्या पण डिव्हाईन मात्र तिच्या नावाप्रमाणेच एकापेक्षा एक डिव्हाईन शॉट्स मारत होती. शिखा पांडेने डिव्हाईनला बाद करण्यापूर्वी तिने १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ३२ धावा केल्या. तर पेरी आणि मानधना संघाचा डाव पुढे नेत असतानाच स्मृती मिन्नू मिनीच्या गोलंदाजीवर झेलबाद झाली. तिने ३१ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने ३१ धावा केल्या. तत्पूर्वी दिल्ली कॅपिटल्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामना सुरू झाल्यानंतरही हा निर्णय संघासाठी खूपच फायदेशीर ठरला. कारण संघाच्या दोन्ही सलामीवीरांनी पॉवरप्लेमध्ये एकही विकेट न गमावता ६१ धावा केल्या. शफाली वर्मा तडाखेबंद फलंदाजी पुन्हा एकदा पाहायला मिळाली, तिने २७ चेंडूंत २ चौकार आणि ३ षटकार मारत ४४ धावा केल्या तर तिला मेग लॅनिंगने साथ दिली. पॉवरप्लेपर्यंत सामना पूर्णपणे दिल्लीच्या हातात होता पण आठवे षटक दिल्लीसाठी एखाद्या वाईट स्वप्नासारखे ठरले. त्यानंतर संघ २० षटके पूर्ण होण्यापूर्वीच ऑल आऊट झाला. दिल्लीच्या डावातील आठव्या षटकात शफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज आणि ॲलिस कॅप्सी यांना आरसीबीच्या सोफी मॉलिन्यूने ३ विकेटस घेत दिल्लीचे कंबरडे मोडले. यानंतर संघाचा डाव सावरू पाहणाऱ्या लॅनिंगला (२३( उत्कृष्ट गोलंदाज श्रेयंका पाटीलने पायचीत केले.

### एलिस पेरीच्या जबरदस्त चौकार

» लॅनिंगने रिव्ह्यू घेतला पण तिला बाद घोषित करण्यात आले. यानंतर १४व्या षटकात आशा शोभनाने मारिजन कापला (१६) डिव्हाईनकरवी झेलबाद केले, तर तिसऱ्या चेंडूवर जोनासनला (३) मानधनाकरवी झेलबाद केले. यानंतर मिन्नू मनीला (५)श्रेयंकाने पायचीत करत सातवी विकेट घेतली. १६व्या षटकात दिल्ली संघाने ७ विकेट बाद १०० धावांचा टप्पा गाठला. आशा शोभनाच्या गोलंदाजीवर धाव घेण्याच्या नादात राधा यादव धावबाद झाली. त्यानंतर १९व्या षटकात श्रेयंकाने सलग दोन विकेट घेत आरसीबीला ऑलआऊट केले. तिच्या या २ विकेट्समध्ये अरूधती रेड्डीला क्लीन बोल्ड केले तर अखेरची विकेट म्हणून तानिया भाटियाला झेलबाद केले.एलिस पेरीच्या जबरदस्त चौकार आणि अखेरीस रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जेतेपदावर आपले नाव कोरले आहे.

# गब्बर कोणत्या शिलेदारांना मैदानात उतरवणार ?

## आयपीएलच्या महासंग्रामाला 22 मार्चपासून सुरुवात होणार

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलच्या महासंग्रामाला 22 मार्चपासून सुरुवात होणार आहे. चेन्नई आणि आरसीबी यांच्यातील लढतीने आयपीएलच्या 17 व्या हंगामाचा शुभारंभ होणार आहे. प्रत्येक संघाने कॅम्प लावले असून कसून सरावाला सुरुवात केली आहे. यंदाच्या हंगामात प्रत्येक संघामध्ये मोठे बदल झाले आहेत, नवे खेळाडू संघात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक संघाच्या प्लेईंग 11 मध्ये बदलाची शक्यता आहे. शिखर धवनच्या नेतृत्वातील पंजाब संघामध्येही यंदा बदल निश्चित मानले जातेय.**



यंदाच्या हंगामात शिखर धवन कोणत्या 11 खेळाडूसह मैदानात उतरु शकतो, याबाबत जाणून घेणार आहोत. शिखर धवनच्या नेतृत्वातील पंजाब संघाने कसून तयारी सुरु केली आहे. गतवर्षीचा आयपीएल हंगामात पंजाबची कामगिरी अतिशय निराशाजनक राहिली होती. पण आता पंजाबचा संघ पुन्हा एकदा पुढील हंगामासाठी सज्ज झालाय. पंजाबचा पहिला सामना दिल्लीविरोधात 23 मार्च रोजी होणार आहे. पंजाब संघाच्या प्लेईंग 11 मध्ये जितेश शर्मा, लियाम लिव्हिंगस्टोन यासारख्या खेळाडूंना स्थान निश्चित मानले जातेय. हर्षल पटेल याला पंजाबनं तब्बल 11.75 कोटींची रक्कम देत संघात घेतलेय. हर्षल पटेलची बेस प्राईज फक्त दोन कोटी इतकी होती, त्याला पंजाबनं 11.75 कोटी रुपयांमध्ये खरेदी केलेय. हर्षल पटेल पंजाबसाठी गेम चेंजर ठरु शकतो. गेल्या हंगामात आरसीबीकडून खेळताना हर्षल पटेलने 13 सामन्यात 14 विकेट घेतल्या होत्या. त्याआधी 2022 मध्ये 15 सामन्यात 19 विकेट घेतल्या होत्या. त्याशिवाय त्याची देशांतर्गत क्रिकेटमध्येही चमकदार कामगिरी राहिली. अष्टपैलू सॅम करनही पंजाबची सर्वात मोठी ताकद ठरेल. त्याने गेल्या हंगामात 14 सामन्यात 10 विकेट घेतल्या होत्या.

### 2023 मध्ये निराशाजनक कामगिरी

» त्याशिवाय फलंदाजी करताना 276 धावांचा पाऊस पाडला होता. गतवर्षीचा आयपीएल हंगामात पंजाबची कामगिरी अतिशय निराशाजनक राहिली होती. गुणतालिकेत पंजाबचा संघ आठव्या स्थानावर राहिला होता. पंजाबला फक्त सहा सामन्यात विजय मिळवता आला तर आठ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. पंजाबला सनरायजर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, आरसीबी, लखनौ, मुंबई , कोलकाता आणि दिल्लीने पराभूत केले होते. आता पंजाब यंदाच्या हंगामात दिल्लीसोबत पहिला सामना होणार आहे. आयपीएलच्या महासंग्रामाला 22 मार्चपासून सुरुवात होणार आहे. चेन्नई आणि आरसीबी यांच्यातील लढतीने आयपीएलच्या 17 व्या हंगामाचा शुभारंभ होणार आहे.